सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

वास्तव २१ वर्षे

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

स्क्रीन रिडरचा बादशहा

सच करीब से ही दिखता है...!

• बीड • रविवार, दिनांक १९ एप्रिल २०२६ • वर्ष २१ वे • पाने : ४ http://epaper.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com • किंमत ३ रुपये

# आईला लिव्ह-इनचं खूळ ! प्रियकराने पाच वर्षीय मुलाच्या डोळ्यात मिरची पावडर टाकून डोक्यावर वार करीत क्रूरपणे संपवलं !!

- मतिमंद बालक, जो स्वत :चे रक्षणही करू शकत नव्हता, त्याच्या अशा पद्धतीने झालेल्या हत्येने सामाजिक मानसिकतेवर मोठे प्रश्नचिन्ह !
- हृदयद्रावक घटना ! मृत श्रावण मतिमंद होता, तरीही प्रेमसंबंधांत अडसर ठरत असलेल्या मतिमंद श्रावणची अत्यंत क्रूरपणे केली हत्या !!
- नरसिमलु आणि या महिलेला त्यांच्या अनैतिक नात्यात श्रावण अडसर ठरत असल्याने या निरागस बालकाला कायमचं संपवलं !

## पोटच्या मुलाचा जीव घेताना पाषाणहृदयी आईचे हात जराही थरथरले नाहीत !!

**कामारेड्डी : आपल्या अनैतिक प्रेमसंबंधांमध्ये अडथळा ठरत असल्याच्या कारणामुळे एका निर्दयी मातेने प्रियकराच्या मदतीने आपल्याच 5 वर्षांच्या निष्पाप मुलाचा काटा काढल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. माणुसकीला काळीमा फासणाऱ्या या कृत्याने संपूर्ण राज्य हादरले असून, पोलिसांनी आरोपी आई आणि तिच्या प्रियकराला बेड्या ठोकल्या आहेत. स्वत :च्या सुखासाठी पोटच्या मुलाचा बळी घेणाऱ्या या आईबद्दल परिसरातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.**




### काय घडलं होतं नेमकं?

● ही हृदयद्रावक घटना तेलंगणातल्या कामारेड्डी शहरातील श्रीराम नगर कॉलनीमध्ये घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील मुख्य आरोपी नरसिमलु हा राजमपेट मंडळ येथील एका महिलेसोबत गेल्या सहा महिन्यांपासून लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत होता. ही महिला आपल्या पतीपासून विभक्त झाली होती. तिला एक ८ वर्षांची मुलगी आणि श्रावण नावाचा ५ वर्षांचा मुलगा होता. विशेष म्हणजे, मृत श्रावण हा मतिमंद होता, मात्र तरीही पोटच्या मुलाचा जीव घेताना या पाषाणहृदयी आईचे हात थरथरले नाहीत.

### हृदयद्रावक आणि अत्यंत क्रूर हत्या

नरसिमलु आणि या महिलेला त्यांच्या नात्यात श्रावण अडसर वाटत होता. त्यातूनच त्यांनी या निरागस बालकाला कायमचं संपवण्याचा क्रूर कट रचला.

घटनेच्या दिवशी मुलाची आई घराबाहेर असल्याची संधी साधून नरसिमलु दारूच्या नशेत धुंद होऊन घरी गेला. त्याने सुरुवातीला श्रावणच्या डोळ्यात मिरची पावडर फेकले जेणेकरून त्याला काहीही दिसणार नाही आणि तो प्रतिकार करू शकणार नाही. त्यानंतर लाकडी दांडक्याने त्याच्या डोक्यावर सपासप वार केले. या भीषण हल्ल्यात चिमुरड्या श्रावणचा जागीच तडफडून मृत्यू झाला.

### पोलिसांची धडक कारवाई

या क्रूर हत्येची माहिती मिळताच पोलीस पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. घटनेचा पंचनामा करून चिमुरड्याचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवला आहे. प्राथमिक तपासाअंती पोलिसांनी नरसिमलु आणि मुलाच्या आईला संशयावरून ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे. एका मतिमंद बालकाची, जो स्वत :चे रक्षणही करू शकत नव्हता, अशा पद्धतीने झालेली हत्या सामाजिक मानसिकतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत असून दोषींना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी स्थानिक नागरिक करत आहेत.

## खळबळजनक : आष्टीच्या शिवमंदिराच्या पाठीमागे ४७ वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळला

➤ **आष्टी : प्रतिनिधी**

आष्टी येथील बाबाजी कुस्ती संकुलासमोरील शिवमंदिराच्या पाठीमागे शनिवारी ४७ वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. दर्शनासाठी गेलेल्या एका भाविकाने ही घटना पाहिल्यानंतर ही बाब समोर आली. हा नैसर्गिक मृत्यू आहे की घातपात, हे अद्याप स्पष्ट झाले नाही.

गजानन लोडबाजी साबळे ( वय ४७ ) असे मृत तरुणाचे नाव आहे. यवतमाळ जिल्ह्यातील हा तरुण आष्टी तालुक्यातील एका हॉटेलवर कामगार म्हणून आल्याचे बोलले जात आहे.





शनिवारी सायंकाळच्या सुमारास शिवमंदिराच्या पाठीमागे मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडताच घटनास्थळी आष्टी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शरद भुतेकर, सहायक पोलीस निरीक्षक विक्रांत हिंगे, सहायक पोलीस निरीक्षक विजय नरवाडे, पोलीस उपनिरीक्षक कृष्णा शिंदे यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी धाव घेतली.

मृताच्या खिशातील आधारकार्डवरून त्याची ओळख पटली आहे. गजानन लोडबाजी साबळे ( वय ४७ ), मूळ रहिवासी सावरगाव काळे, जिल्हा यवतमाळ येथील असल्याची माहिती मिळाली.

मृतदेह शासकीय रुग्णालय, आष्टी येथे ठेवण्यात आला आहे. मृत्यू नैसर्गिक कारणाने झाला की घातपात, हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पोलिस तो नेमका कोणत्या हॉटेलवर कामगार म्हणून काम करत होता, याचा शोध घेत आहेत.

## मांजरसुंबा येथील तरुणाला मारहाण व आत्महत्येस प्रवृत्त प्रकरणातील चारही आरोपींचा जामीन मंजूर

### आरोपी मार्फत वकील अ‍ॅड. दिनेश विनायकराव जाधव यांच्या कामाचे कौतुक

➤ **बीड : प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील नेकनरू पोलीस ठाण्याच्या हद्दीत दाखल झालेल्या गु.र.नं.122/2026 या गंभीर गुन्ह्यातील चारही आरोपींना जामीन मंजूर करण्यात आला आहे. या प्रकरणात मा. जिल्हा व सत्र न्यायालय, बीड यांनी दिलासा देत चार ही आरोपींचे जामीन अर्ज मंजूर केले आहेत.



या गुन्ह्यात आरोपी क्रमांक 1 व 2 यांचा नियमित जामीन अर्ज मंजूर करण्यात आला. तर आरोपी क्रमांक 3 आणि 4 यांचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, दिनांक 28 मार्च 2026 रोजी सकाळी सुमारे 10.30 वाजण्याच्या सुमारास ससेवाडी येथे चार ही आरोपी यांनी ज्ञानेश्वर याला पकडून त्याच्यावर चोरीचा खोटा आरोप केला. त्यानंतर त्याला मारहाण करण्यात आली, शिवीगाळ करण्यात आली तसेच जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्या. या घटनेमुळे ज्ञानेश्वर याला शारीरिक तसेच मानसिक त्रास सहन करावा लागला. तसेच, फिर्यादीत पुढे नमूद आहे की, दिनांक 29 मार्च 2026 रोजी ज्ञानेश्वर याने ● पान ४ वर ...

**सामान्यांसाठी आवाज उठवला** ➤ हॅरीच्या जाण्याने सामाजिक क्रांती आणण्यासाठी झटणारा एक लढवय्या गमविला

## खरा निस्वार्थी समाजसेवक हॅरिसन फ्रान्सिस रेड्डी यांची पाचवी पुण्यतिथी राजकीय लोकांनो विसरू नका - एस. एम. युसूफ़

➤ **बीड : प्रतिनिधी**

तहहयात अजातशत्रू राहिलेले हॅरीसन फ्रान्सिस रेड्डी यांची दिनांक २० एप्रिल २०२६ सोमवार रोजी पाचवी पुण्यतिथी आहे. यानिमित्ताने निदान राजकीय लोकांनी तरी रेड्डी साहेबांना विसरू नये असे आवाहन मुक्त पत्रकार एस.एम. युसूफ़ यांनी केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, हॅरीसन फ्रान्सिस रेड्डी हे अवघे ५४ वर्षांचे आयुष्य जगले. या कालावधीत त्यांनी सदैव सर्वसामान्यांसाठी आवाज उठविला. अनेक सामाजिक मुद्द्यांसाठी नेहमी लढले, झगडले. उपोषण, मोर्चे, धरणे असे नाना आंदोलन केले. परंतु इतर राजकारण्यांसारखे त्यांना राजकीय छक्के-पंजे, लांडी-लबाडी करणे कधीच जमले नाही. म्हणून ते जीवनात इतर राजकारण्यांसारखी माया जमवू शकले नाही. तहहयात कफल्लकच राहिले आणि २० एप्रिल २०२१ रोजी जग सोडून गेले. त्यांच्या जाण्याने सामाजिक क्रांती आणण्यासाठी झटणारा एक लढवय्या अवलिया समाजाने गमविला.





राजकारणात सर्वप्रथम त्यांना मान-सन्मान दिला तो निजाम शेख ( सरकार ) यांनी आणि त्यांच्यानंतर अ‍ॅड. शफिक शेख ( भाऊ ) यांनी. रेड्डी साहेबांतील माणुसकीसाठी जगणारा माणूस या दोन्ही नेत्यांनी अनेक वर्षे जवळून पाहिला, अनुभवला. गेल्या वर्षी रेड्डी साहेबांच्या चौथ्या पुण्यतिथी निमित्ताने निजामभाईंनी बेघर निवारा गृहात अन्नदान करून रेड्डी साहेबांचे स्मरण केले होते. आपल्या जुन्या साथीदाराचे मरणोपरांत स्मरण करून निजामभाईंनी माणुसकीचे दर्शन घडविले होते. त्यांच्यासारखेच इतर राजकारण्यांनी सुद्धा रेड्डी साहेबांच्या पुण्यतिथी निमित्ताने दरवर्षी काही ना काही सामाजिक उपक्रम किंवा कार्यक्रम घ्यावे, राबवावे. हॅरीसन फ्रान्सिस रेड्डी सारख्या निस्वार्थी, निष्कपट, निष्कलंक व्यक्तिमत्वाला विसरू नये. असे आवाहन मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.

## कन्नड नक्शा प्रकल्प अंतिम टप्प्यात; मिळकत नकाशे व हक्क तपासणीसाठी आवाहन

➤ **कन्नड / प्रतिनिधी :**

कन्नड नगरपरिषद हद्दीत राबविण्यात येत असलेला नक्शा ( पथदर्शी ) प्रकल्प आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले असून गावठाण क्षेत्रातील प्रारुप अंतिम नकाशे व चौकशी नोंदवही प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

उपअधीक्षक भूमि अभिलेख कन्नड कैलास निसाळ यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, संबंधितांनी आपापल्या मिळकतीचे नकाशे व अभिलेख तपासून पाहावेत. हे नकाशे व नोंदवही ऑनलाइन तसेच नगरपालिका कन्नड कार्यालय, तहसील कार्यालय कन्नड आणि उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय येथे पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. नागरिकांनी आपल्या मालमत्तेबाबतची माहिती योग्य आहे की नाही, याची खात्री करून घ्यावी.

जर कोणाला नोंदीत दुरुस्ती सुचवायची असेल किंवा हरकत नोंदवायची असेल, तर ती आवश्यक कागदपत्रांसह २३ एप्रिल २०२६ पर्यंत लेखी स्वरूपात उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, कन्नड येथे सादर करावी. तसेच ही प्रक्रिया ऑनलाइन SVAMITVA Portal या संकेतस्थळावरूनही करता येणार आहे.

या प्रकल्पामुळे नागरिकांना त्यांच्या मिळकतीचे अधिकृत नकाशे व हक्क स्पष्ट होणार असून भविष्यातील व्यवहार सुलभ होण्यास मदत होणार आहे

# आजचे राशि भविष्य

## मेष रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्‌भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मिथुन रास

या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्‌भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

## कर्क रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## सिंह रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कन्या रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

## तूळ रास

आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## वृश्चिक रास

आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## धनु रास

आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वतःच्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## मकर रास

या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कुंभ रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

## मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# महात्मा बसवेश्वर : समता, श्रम आणि मानवतेचा अनंत दीप



विशेष




**प्रवीण बागडे**
नागपूर मो.क्र.९९२३६२०९१९

भारतीय सामाजिक इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की त्यांनी आपल्या काळाच्या चौकटी मोडून पुढील अनेक शतकांसाठी विचारांचे दिशादर्शन केले. बाराव्या शतकातील कर्नाटकात जन्मलेले महात्मा बसवेश्वर (बसवण्णा) हे असेच एक क्रांतिकारी समाजसुधारक, तत्त्वज्ञ आणि लोकनेते होते. त्यांच्या जयंती निमित्त त्यांचे विचार केवळ स्मरणात ठेवण्याचा नव्हे, तर आजच्या सामाजिक वास्तवाशी जोडून नव्याने आकलन करण्याचा हा क्षण आहे. बसवेश्वरांचे कार्य केवळ धार्मिक सुधारणा किंवा आध्यात्मिक चळवळ म्हणून मर्यादित नव्हते; ते एक व्यापक सामाजिक क्रांतीचे प्रारूप होते. त्या काळात समाजात जात-पात, वर्णव्यवस्था, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांचे प्राबल्य होते. उच्चवर्णीयांच्या वर्चस्वाखाली सामान्य माणूस, विशेषतः शूद्र आणि स्त्रिया, अन्यायाच्या गर्तेत अडकले होते. अशा वेळी बसवेश्वरांनी 'समता', 'स्वातंत्र्य' आणि 'बंधुता' या मूल्यांवर आधारित एक नवा समाजव्यवस्थेचा आराखडा मांडला.

बसवेश्वरांच्या विचारांची मध्यवर्ती संकल्पना म्हणजे "कायकवे कैलास" म्हणजेच श्रम हीच पूजा. त्यांनी श्रमाला केवळ आर्थिक क्रिया न मानता त्याला आध्यात्मिक उंचीवर नेले. कोणतेही काम लहान किंवा मोठे नसते; प्रत्येक श्रमाला समान प्रतिष्ठा मिळाली पाहिजे, हा त्यांचा ठाम विश्वास होता. आजच्या काळातही 'डिग्निटी ऑफ लेबर'ची जी चर्चा आपण करतो, ती बसवेश्वरांनी शेकडो वर्षांपूर्वी प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला होता. याचबरोबर त्यांनी "दासोह" ही संकल्पना मांडली म्हणजे आपल्या श्रमातून मिळालेल्या उत्पन्नाचा काही भाग समाजासाठी अर्पण करणे. ही केवळ दानधर्माची भावना नव्हे, तर सामाजिक न्यायाचा एक मार्ग होता. समाजातील दुर्बल घटकांना सक्षम करण्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखावी, हा या विचाराचा गाभा आहे. आजच्या कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेतही या तत्त्वाची छाया दिसून येते.

बसवेश्वरांनी स्थापन केलेले "अनुभव मंटप" हे जगातील पहिले लोकशाही संसद मानले जाते. येथे समाजातील सर्व स्तरांतील लोक स्त्री-पुरुष, विविध जातींचे प्रतिनिधी एकत्र येऊन सामाजिक, धार्मिक आणि नैतिक विषयांवर मुक्तपणे चर्चा करत. या मंचावर स्त्रियांनाही समान स्थान होते, हे विशेष महत्त्वाचे आहे. त्या काळात स्त्रियांच्या शिक्षणावर आणि सहभागावर अनेक बंधने असताना बसवेश्वरांनी त्यांना विचार मांडण्याचे व्यासपीठ दिले. आजच्या लोकशाही व्यवस्थेचा बीजारोपण त्या काळातच त्यांनी केले होते, असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. बसवेश्वरांचे आणखी एक महत्त्वाचे योगदान म्हणजे त्यांनी जातिव्यवस्थेला दिलेले आव्हान. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, माणसाची ओळख त्याच्या जन्मावर नव्हे, तर त्याच्या कर्मावर आणि चारित्र्यावर ठरते. त्यांनी विविध जातींतील लोकांचे आंतरजातीय विवाह घडवून आणले, ज्यामुळे समाजात मोठी खळबळ उडाली. या कृतीतून त्यांनी सामाजिक बंधने मोडून काढण्याचा प्रत्यक्ष प्रयत्न केला. आजही आंतरजातीय विवाहांना विरोध होतो, हे वास्तव पाहता बसवेश्वरांचे कार्य किती दूरदर्शी होते, हे लक्षात येते. बसवेश्वरांचे विचार त्यांच्या वचने या काव्यरूपातून प्रकट झाले. ही वचने अत्यंत सोप्या, थेट आणि प्रभावी भाषेत मांडलेली आहेत. त्यात त्यांनी देव, धर्म, समाज आणि नैतिकता यांबाबतचे आपले विचार स्पष्टपणे मांडले. त्यांनी मूर्तिपूजा, कर्मकांड आणि अंधश्रद्धांचा निषेध केला आणि ईश्वराशी थेट नाते जोडण्यावर भर दिला. त्यांच्या मते, देव मंदिरात नसून प्रत्येकाच्या अंतःकरणात आहे. हा विचार आधुनिक मानवतावादी दृष्टिकोनाशी सुसंगत आहे. आजच्या काळात बसवेश्वरांच्या विचारांची उपयुक्तता अधिकच वाढली आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आपण आधुनिकतेच्या उंबरठ्यावर उभे आहोत, पण सामाजिक विषमता, जातीय द्वेष, आर्थिक असमानता आणि नैतिक अधःपतन यांसारख्या समस्या अजूनही कायम आहेत. अशा वेळी बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान आपल्याला नव्या दिशेने विचार करायला भाग पाडते. आज 'स्टार्टअप', 'गिग इकॉनॉमी', 'स्वयंरोजगार' यांची चर्चा होत असताना "कायकवे कैलास" ही संकल्पना अधिक सुसंगत वाटते. प्रत्येकाने स्वावलंबी होऊन प्रामाणिकपणे श्रम करावेत आणि समाजाच्या विकासात योगदान द्यावे, हा संदेश आजच्या युवकांसाठी प्रेरणादायी आहे. त्याचप्रमाणे, 'दासोह'च्या माध्यमातून समाजातील दुर्बल घटकांसाठी संवेदनशीलता वाढवणे ही आजची गरज आहे. लोकशाहीच्या दृष्टीनेही बसवेश्वरांचे विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. आज लोकशाही व्यवस्था अस्तित्वात असली, तरी तिच्या मूल्यांची अधोगती होत असल्याचे दिसते. मतभेद सहन करण्याची क्षमता कमी होत आहे, संवादाऐवजी संघर्ष वाढत आहे. अशा वेळी 'अनुभव मंटप'सारख्या मुक्त संवादाच्या व्यासपीठांची गरज आहे, जिथे विविध विचारांचे आदान-प्रदान होऊ शकते. स्त्री-पुरुष समानतेच्या संदर्भातही बसवेश्वरांचे विचार आजही मार्गदर्शक ठरतात. त्यांनी स्त्रियांना शिक्षण, विचार मांडण्याचे स्वातंत्र्य आणि समाजातील समान स्थान दिले. आजही स्त्रियांच्या सुरक्षिततेचा, समान संधींचा आणि सन्मानाचा प्रश्न पूर्णपणे सुटलेला नाही. त्यामुळे बसवेश्वरांचे स्त्रीसमानतेचे तत्त्वज्ञान अधिकच महत्त्वाचे ठरते. बसवेश्वरांनी धर्माला मानवी मूल्यांशी जोडले. त्यांनी धर्माचा उपयोग माणसाला विभाजित करण्यासाठी नव्हे, तर एकत्र आणण्यासाठी केला. आजच्या काळात धर्माच्या नावाखाली निर्माण होणाऱ्या तणावाच्या पार्श्वभूमीवर त्यांचे विचार अधिकच सुसंगत वाटतात. धर्म म्हणजे करुणा, प्रेम आणि सहिष्णुता हा संदेश त्यांनी दिला. बसवेश्वर जयंती हा केवळ उत्सवाचा दिवस नाही, तर आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण त्यांच्या विचारांचे कितपत पालन करतो, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे. समाजात समता, न्याय आणि बंधुता प्रस्थापित करण्यासाठी आपण काय करतो, याचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे. आज गरज आहे ती बसवेश्वरांच्या विचारांना केवळ भाषणांपुरते मर्यादित न ठेवता ते प्रत्यक्ष जीवनात उतरवण्याची. शिक्षण, प्रशासन, राजकारण आणि सामाजिक क्षेत्रात त्यांच्या तत्त्वांचा अवलंब केल्यास समाज अधिक न्याय्य आणि समताधिष्ठित होऊ शकतो. शेवटी, बसवेश्वरांचे जीवन आणि कार्य आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देते. समाज बदलण्यासाठी केवळ विचार पुरेसे नसतात, तर त्यासाठी कृतीचीही आवश्यकता असते. त्यांनी आपल्या आयुष्यातून हे सिद्ध केले की, एक व्यक्तीही समाजात मोठा बदल घडवू शकते.

महात्मा बसवेश्वरांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करताना, त्यांच्या विचारांचा दीप आपल्या मनात प्रज्वलित ठेवण्याचा संकल्प करूया. समता, श्रम आणि मानवतेच्या मूल्यांवर आधारित समाज निर्माण करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.



# गौताळा व्हॅली स्कूलचा दहावी (CBSE) निकाल १००% खुशिता भोसले व आयुष पाटील संयुक्त प्रथम

**विद्यार्थ्यांचे घवघवीत यश; शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांच्या सहकार्याची फलश्रुती**

**कन्नड / प्रतिनिधी :** शहरातील श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित गौताळा व्हॅली स्कूल या शाळेचा इयत्ता दहावी (CBSE) परीक्षेचा निकाल यंदाही परंपरेप्रमाणे १०० टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

यावर्षी परीक्षेला बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण होत शाळेच्या यशाची परंपरा कायम राखली. यामध्ये आयुष पाटील आणि खुशिता भोसले यांनी प्रत्येकी ९७.४० टक्के गुण मिळवत संयुक्तपणे प्रथम क्रमांक पटकावला. तसेच प्रणाली देशमुख (९७.२०), श्लोक सोळुंके (९६.२०), तृप्ती सोमासे (९५.००), कस्तुरी साळुंके (९३.४०), अमृता तायडे (९२.४०), अथर्व भोसले (९१.००) आणि ऋतुजा गंडे (९०.४०) यांनीही उल्लेखनीय यश मिळवले. विद्यार्थ्यांच्या या यशामागे शिक्षकांचे सक्षम मार्गदर्शन, नियमित अभ्यासाची सवय आणि पालकांचे मोलाचे सहकार्य कारणीभूत ठरले आहे.

या यशाबद्दल श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, शाळेचे प्राचार्य राजकुमार क्षीरसागर, सर्व शिक्षक व पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# सांगवी पाटणची पहिली महिला एम.बी.बी.एस : डॉ. स्नेहल खिलारे यांचे ऐतिहासिक यश

**आष्टी / प्रतिनिधी :** आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील डॉ. स्नेहल दत्तात्रय खिलारे या गावातील पहिली महिला एम.बी.बी.एस पदवीधर ठरल्या आहेत. त्यांनी २०२० मध्ये संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेऊन २०२६ मध्ये ही पदवी यशस्वीपणे पूर्ण केली. डॉ. स्नेहल यांच्या या कर्तृत्वामुळे सर्व सांगवी पाटण ग्रामस्थ, नातेवाईक व पंचक्रोशीतील नागरिकांकडून त्यांना शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



आजच्या काळात मुली सर्व क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करत आहेत. डॉ. स्नेहल यांचे हे यश त्याचेच प्रतिबिंब आहे. त्यांच्या प्रगतीवरून हाच संदेश मिळतो की, अभ्यास करत रहा, यश हमखास मिळते.

# बांदखेल येथील जोगेश्वरी मातेची यात्रा, यात्रेत तब्बल पाच लक्ष रूपयांचे कुस्ती मैदान संपन्न

**रखरखत्या उन्हाच्या झळा कुस्तीला पहोचवू नये, यासाठी सरपंच विशाल झांबरे यांची अनोखी शक्कल**

**आष्टी / प्रतिनिधी :** आष्टी तालुक्यातील बांदखेल येथील जोगेश्वरी मातेची यात्रा निमित्त आष्टी तालुक्यातील सर्वात मोठे कुस्ती मैदान संपन्न झाले.

यावेळी रखरखत्या ऊन्हाचा मल्लांना त्रास होउ नये त्यांचे उन्हापासून संरक्षण व्हावे यासाठी गावचे सरपंच विशाल झांबरे यांनी कुस्ती मैदानावर भव्य आसा मंडप उभारला व कुस्ती आखाडा पार पडला यामध्ये शेकडो मल्लांनी या कुस्ती आखाड्यात हजेरी लावली होती.

आपल्या महाराष्ट्राची ओळख लाल मातीतील कुस्ती ग्रामीण भागात टिकवून राहवी यासाठी आष्टी तालुक्यातील बांधखेल येथे जोगेश्वरी मातेची यात्रे निमित्त भव्य कुस्ती आखाडा पार पडला. शंभर रूपया पासून शेवटची एक्काहत्तर हजार रूपया पर्यंत कुस्ती पार पडली आहे. बांदखेल येथील कुस्ती मैदान पहाण्यासाठी कुस्ती प्रेमींना मोठी गर्दी केली होती.....

या कुस्ती मैदानासाठी परराज्यातील नामांकित मल्लांनी या कुस्ती आखाड्यात हजेरी लावली होती.

रखरखत्या उन्हात कुस्ती आखाडा पार पडावा म्हणून गावच्या सरपच यांनी कुस्ती मैदानावर उभारला मंडप होता

**आष्टी तालुक्यातील बांदखेल येथील ऐतिहासिक मैदान पहाण्यासाठी कुस्ती प्रेमींची तुफान गर्दी.**



**परराज्यातील मल्लांची बांदखेल येथील कुस्ती मैदानाला हजेरी.** **दुपारी ते रात्री ९ पर्यंत कुस्ती आखाडा संपन्न**



# तुलसी फॅशन डिझाईन कॉलेजमध्ये 'नारी शक्ती' जागरूकता सत्र संपन्न

**अ‍ॅड. आदर्श जाधव यांचे विद्यार्थिनींना सक्षमीकरणाचे आवाहन**

**बीड : प्रतिनिधी** स्थानिक 'तुलसी फॅशन डिझाईन कॉलेज' येथे 'नारी शक्ती कौशल्य अभियान आणि जागरूकता सत्र' अत्यंत उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमाला परिसरातील महिला, शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थिनींचा उदंड प्रतिसाद लाभला. या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून अ‍ॅड. आदर्श अरुणराव जाधव उपस्थित होते.






या सत्राच्या वेळी तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनच्या प्राचार्य अश्विनी बेद्रे मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून करण्यात आली.

**आरक्षण ही संधी, तर शिक्षण हे शस्त्र!**

यावेळी विद्यार्थिनींशी संवाद साधताना अ‍ॅड. आदर्श जाधव यांनी महिलांच्या राजकीय, सामाजिक आणि कायदेशीर हक्कांवर सविस्तर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून महिलांना जे समतेचे अधिकार दिले, त्याच स्वप्नाला 'नारी शक्ती वंदन अधिनियम' (महिला आरक्षण विधेयक) पूर्णत्वास नेणारे आहे. महिलांनी केवळ 'मतदार' न राहता 'निर्णय घेणाऱ्या' नेतृत्वाच्या भूमिकेत समोर येणे ही काळाची गरज आहे.

**विविध विषयांवर मार्गदर्शन**

या सत्रात राजकीय आरक्षणासोबतच महिलांचे आरोग्य, शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबन या विषयांवरही सखोल चर्चा करण्यात आली. महिलांच्या प्रगतीत येणारे सामाजिक अडथळे कसे दूर करावेत, याबद्दल अ‍ॅड. जाधव यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. प्राचार्य अश्विनी बेद्रे मॅडम यांनी विद्यार्थिनींना अशा उपक्रमांतून मिळणाऱ्या ज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनात वापर करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी संचालन व उपस्थितांचे आभार प्रदर्शन रूषालि मॅडम यांनी केले. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये एक नवा आत्मविश्वास निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले.

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक - अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

**विशेष**

# शिक्षक सिराज पठाण यांची बहुआयामी कामगिरी

**गायन, ज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात सिराज पठाण यांचा ठसा; 'अमेझॉन फ्युचर इंजिनिअर' उपक्रमात यश**



**➤ विहामांडवा : प्रतिनिधी**
गायन, शैक्षणिक गुणवत्ता आणि आता तंत्रज्ञान या तिन्ही क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत शिक्षक सिराज पठाण यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. 'अमेझॉन फ्युचर इंजिनिअर' या जागतिक उपक्रमांतर्गत आयोजित Computer Science Teaching Excellence या कोर्स-स्पर्धेत त्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

ही स्पर्धा 'लिडर फॉर इक्विटी (LFE)' संस्थेमार्फत नोव्हेंबर–डिसेंबर २०२५ दरम्यान आयोजित करण्यात आली होती. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील तब्बल ४ हजार शिक्षकांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. अलीकडेच जाहीर झालेल्या निकालात पैठण तालुक्यातील जि.प. प्रशाला ढोरकीनचे सहशिक्षक सिराज पठाण यांची निवड विजेत्यांमध्ये झाली.

हा उपक्रम विद्यार्थ्यांना संगणक विज्ञान शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासोबतच तंत्रज्ञान क्षेत्रात करिअर घडविण्यासाठी मार्गदर्शन करणारा आहे. विशेषत: वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना सक्षम करण्यावर या उपक्रमाचा भर आहे. या अंतर्गत शिक्षकांना कोडींग, गेमिंग, स्क्रॅच यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञान कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणानंतर शिक्षकांनी स्वत:चे प्रकल्प ऑनलाईन सादर केले, त्यावर आधारित विजेत्यांची निवड करण्यात आली.

प्रादेशिक विद्या प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या बक्षीस वितरण समारंभात सिराज पठाण यांना लॅपटॉप व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी डायटचे प्राचार्य राजेंद्र कांबळे, वरिष्ठ अधिव्याख्याता येवते, आदर्श शाळा जिल्हा नियंत्रक जैन, तसेच LFE चे जिल्हा समन्वयक बारहाते, निंबाळकर आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी विजेत्या शिक्षकांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**महत्वाचे ठळक मुद्दे**
● 'अमेझॉन फ्युचर इंजिनिअर' अंतर्गत शिक्षकांसाठी CS Teaching Excellence स्पर्धा ● छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सुमारे ४,००० शिक्षकांचा सहभाग ● पैठण तालुक्यातील जि.प. प्रशाला ढोरकीनचे शिक्षक सिराज पठाण यांचे यश ● विजेत्यांना लॅपटॉप व प्रमाणपत्र देऊन गौरव
● विद्यार्थ्यांना कोडींग, गेमिंग, स्क्रॅचद्वारे आधुनिक शिक्षणाचा लाभ




# असा यावा पाऊस देवा... शेतकरी कवी संमेलनातून दुष्काळाच्या वेदनांना शब्द

**➤ खेर्डा खुर्द येथे शेतकरी संघटनेच्या शिबिरात कवितांतून पावसाची आळवणी, दुष्काळ आणि राजकीय व्यवस्थेवर प्रहार**

**➤ अरविंद ओव्हाळ : प्रतिनिधी**
रखरखते ऊन, कोरडी पडलेली विहीर आणि आभाळाकडे डोळे लावून बसलेला बळीराजा ग्रामीण महाराष्ट्राचे हे जिवंत वास्तव गुरुवारी (ता. १६) माजलगाव तालुक्यातील खेर्डा खुर्द येथे शब्दांच्या माध्यमातून उभे राहिले. शेतकरी संघटनेच्या कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरानिमित्त आयोजित शेतकरी कवी संमेलनात कवींनी आपल्या कवितांमधून शेतकऱ्यांच्या वेदना, आशा आणि संघर्षाला प्रभावी शब्द दिले.

कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ग्रामीण कवी आत्माराम कुटे होते. काव्यमैफलीची सुरुवात होताच कवी सखाराम जोशी यांनी "असा यावा पाऊस देवा, की हे रान ओलं चिंब व्हावं शेतकरी राजाला हिरवं स्वप्न पडावं" या ओळींतून पावसाची आर्त साद मांडली. या ओळींनी उपस्थित शेतकरी बांधवांच्या भावना स्पर्शून गेल्या.



यानंतर डॉ. अंगद गायकवाड यांनी "वर तोंड करून सांगतो, घरी चहाला दूध नाही शेतकऱ्याची औलाद तुझी, पाळ ना एक-दोन गाई" या शब्दांतून ग्रामीण अर्थव्यवस्थेची बिकट अवस्था मांडली. कवितांमधून केवळ भावनाच नव्हे, तर वास्तवाचे भेदक चित्र उभे राहिले.

कार्यक्रमात कवी बालप्रसाद चव्हाण यांनी दुष्काळाचे तीव्र चित्रण करत "तहानात्या या वाड्या-वस्त्या, तहानाले हे गाव-गाव रे" अशा ओळी सादर केल्या. तर विशाल वायाळ यांनी निवडणुकांच्या काळात शेतकऱ्यांचा होणारा राजकीय वापर आणि घोषणांची दिखाऊ भूमिका यावर जळजळीत प्रहार केला. त्यांच्या कवितेला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. कवी बालासाहेब झोडगे यांनी पूर्वीच्या हिरव्यागार शिवाराच्या आठवणी जागवल्या, तर कवयित्री लता जोशी यांनी "सुकलेले रान, सुकलेले पान, सुकलेले जनजीवन" अशा ओळींतून निसर्गाच्या कोपामुळे विस्कळीत झालेल्या जीवनाचे हृदयस्पर्शी चित्र रंगवले.

या कवी संमेलनास शेतकरी संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांच्यासह अच्युत गंगणे, शेख अजीमोद्दीन, शेख इस्माईल, अनंत शिंदे, महादेव गायकवाड, आण्णासाहेब मस्के, मुकुंद जोशी, प्रमोद सरवदे, सतीश रिंगणे, अच्युत मस्के, गणेश गायकवाड, कृष्णा होके, अंगद गायकवाड तसेच परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात खेलबा काळे, कैलास साळुंके, मोहन राठोड, ना. मा. पडलवार आणि उत्तम आवचार यांनीही आपल्या कविता सादर करून शेतकऱ्यांच्या जीवनसंघर्षाला साहित्यिक अभिव्यक्ती दिली. या संमेलनातून शेतकरी चळवळीला साहित्याची प्रभावी जोड मिळाल्याचे स्पष्टपणे दिसून आले. आभार प्रदर्शन अनंत शिंदे यांनी केले.

**महत्वाचे ठळक मुद्दे**
● खेर्डा खुर्द येथे शेतकरी संघटनेच्या प्रशिक्षण शिबिरात कवी संमेलन ● कवितांतून पावसाची आर्त हाक आणि शेतकऱ्यांच्या व्यथा ● दुष्काळ, कोरडी शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे चित्रण ● राजकीय व्यवस्थेवर कडक शब्दांत टीका ● शिवार आणि बदलत्या ग्रामीण जीवनाचे प्रभावी दर्शन

# पिकविम्यातून बीड वगळल्याने शेतकऱ्यांत संताप; निवडणुकीत धडा शिकवण्याचा इशारा

**➤ घोषणांनंतरही मदत नाही; "सारा गाव मामाचा, एक नाही कामाचा" म्हणत लोकप्रतिनिधींवर टीका**

**➤ बीड / प्रतिनिधी :**
अतिवृष्टीमुळे राज्यातील तब्बल ९८ लाख ४३ हजार हेक्टर क्षेत्रावरील खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने प्रतिहेक्टरी १७,५०० रुपयांपर्यंत मदत देण्याची घोषणा केली होती. मात्र, ही घोषणा बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी प्रत्यक्षात अमलात आली नसल्याने संतापाची भावना व्यक्त होत आहे.
खरीप २०२५ च्या पिकविमा योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात ३० जिल्ह्यांतील शेतकऱ्यांसाठी १,२१९ कोटी रुपयांची मदत जाहीर करण्यात आली. तथापि, या यादीत बीड जिल्ह्याचा समावेश नसल्याने स्थानिक शेतकरी निराश झाले आहेत. शासनाने दिलेल्या आश्वासनांनंतरही प्रत्यक्ष मदत न मिळाल्याचा आरोप शेतकरी वर्गातून होत आहे.

जिल्ह्यात दोन खासदार आणि सात आमदार असूनही पिकविमा प्रश्नाकडे अपेक्षित लक्ष दिले गेले नसल्याची टीका करण्यात येत आहे. "सारा गाव मामाचा, एक नाही कामाचा" अशा शब्दांत लोकप्रतिनिधींवर नाराजी व्यक्त केली जात आहे. सरकार, प्रशासन आणि विमा कंपनी यांनी एकत्रितपणे शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.



या पार्श्वभूमीवर, निर्णयाचा फेरविचार करण्यात यावा; अन्यथा येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीत (मिनी मंत्रालय) शेतकरी सरकारला धडा शिकवतील, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते भारत बडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिला आहे.

मागील काही वर्षांत बीड जिल्ह्याला पिकविमा स्वरूपात मोठी रक्कम मिळाल्याने यंदा समावेश करण्यात आलेला नाही, अशी माहिती प्रशासनाकडून समोर येत असल्याचेही सांगितले जात आहे. मात्र, हा निर्णय अन्यायकारक असल्याची भावना शेतकरी वर्गात आहे. तसेच, राज्यातील मंत्री पंकजा मुंडे आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी हस्तक्षेप करून बीड जिल्ह्याचा पिकविम्यात समावेश करावा, अशी मागणी भारत बडे यांनी केली आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या नुकसानीची वस्तुस्थिती शासनासमोर मांडून त्यांना दिलासा देण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणामुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढत असून, येणाऱ्या निवडणुकांमध्ये त्याचे परिणाम दिसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**महत्वाचे ठळक मुद्दे**
● अतिवृष्टीमुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर खरीप पिकांचे नुकसान
● प्रतिहेक्टरी १७,५०० रुपयांची मदत जाहीर, पण बीड जिल्हा वगळला
● ३० जिल्ह्यांसाठी १२१९ कोटींची मदत; बीडचा समावेश नाही
● लोकप्रतिनिधींवर निष्क्रियतेचा आरोप ● मिनी मंत्रालय (जिल्हा परिषद) निवडणुकीत सरकारला धडा शिकवण्याचा इशारा ● मुंडे बहीण-भावांनी हस्तक्षेप करावा, अशी मागणी

**धनराज बजाज ९९.२०% गुणांसह जिल्ह्यात प्रथम** ➤ इतर विद्यार्थ्यांचीही उल्लेखनीय कामगिरी


# सिंदफणा शाळेचा सलग दुसऱ्यांदा सीबीएसईत अव्वल झेंडा

**➤ माजलगाव : अरविंद ओव्हाळ**
सिंदफणा पब्लिक स्कूल, माजलगाव येथील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी सीबीएसई मंडळाच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा लौकिक अधिक उंचावला आहे. विशेष म्हणजे, शाळेने सलग दुसऱ्या वर्षी जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवण्याची कामगिरी करत आपला उत्कृष्ट निकाल कायम राखला आहे.


यंदाच्या निकालात धनराज सचिन बजाज याने ९९.२० टक्के गुण मिळवत बीड जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. त्याचप्रमाणे आदर्श अजयराव मगर व भार्गवी गोपाल गुंजकर यांनी प्रत्येकी ९७.२० टक्के गुण मिळवत द्वितीय स्थान मिळवले, तर सार्थक अशोकराव सोळंके याने ९५.६० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला.



शाळा प्रशासनाच्या माहितीनुसार, निकालाची टक्केवारी ही सीबीएसईच्या 'सर्वोत्तम पाच विषय' पद्धतीनुसार निश्चित करण्यात आली आहे. या पद्धतीत दोन भाषा विषय (कमाल) व इतर मुख्य विषयांपैकी सर्वोत्तम तीन विषयांचा समावेश केला जातो. आवश्यकतेनुसार कौशल्य विषयाचा समावेशही करता येतो. सीबीएसई मंडळ अधिकृत टक्केवारी जाहीर करत नसल्याने विद्यार्थ्यांनी पुढील शिक्षणासाठी ही पद्धत वापरावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.


धनराज बजाज


आदर्श मगर



भार्गवी गुंजकर

या यशामुळे शाळेचे नाव संपूर्ण जिल्ह्यात उज्ज्वल झाले असून पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा विश्वास यामुळे ही कामगिरी शक्य झाल्याचे शाळा प्रशासनाने नमूद केले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष, पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

**महत्वाचे ठळक मुद्दे**
● सिंदफणा पब्लिक स्कूलचा सलग दुसऱ्या वर्षी जिल्ह्यात प्रथम क्रमांक ● धनराज सचिन बजाज – ९९.२०% गुणांसह अव्वल
● आदर्श मगर व भार्गवी गुंजकर – ९७.२०% गुणांसह द्वितीय
● सार्थक सोळंके – ९५.६०% गुणांसह तृतीय ● 'सर्वोत्तम पाच विषय' पद्धतीनुसार टक्केवारीची गणना ● विद्यार्थ्यांच्या यशात शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांचा मोठा वाटा ● सिंदफणा पब्लिक स्कूलचा सीबीएसई दहावी निकाल – सलग दुसऱ्यांदा जिल्ह्यात अव्वल कामगिरी

## महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | त्न | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | न्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |

# बिडकिन, चितेगाव, फारोळा, नानेगाव शिवारातून लाखोंच्या गौण खनिजाची चोरी

## महसूल प्रशासन कोमात तर गौण खनिज चोर जोमात ; चोरांना महसूल विभागासोबतच स्थानिक पुढाऱ्यांचे राजकीय पाठबळ

**पैठण : सर्जेराव खडसन**

पैठण तालुक्यातील बिडकिन, चितेगाव, फारोळा या औद्योगिक क्षेत्रातून तसेच पाचोड रोडवरील नानेगाव परिसरात मागील काही दिवसांपासून गौण खनिज चोरांनी महसूल विभागाच्या नाकावर टिच्चून अक्षरश : धुमाकूळ घातला आहे . या ठिकाणावरून लाखों रुपयांच्या गौण खनिजाचे अवैध्यरित्या उत्खनन व वाहतूक करतानांचे व्हिडिओ सध्या सोशल मीडियावरून तुफान व्हायरल होत आहे . परन्तु महसूल विभाग यांच्यावर कारवाई करण्याचे सोडून फक्त बघ्याची भूमिका घेत असल्याने कुठे तरी पाणी मुरत आहे असे एकंदरीत या सर्व प्रकारावरून स्पष्ट दिसून येत आहे .पैठण तालुक्यातील निर्ढावलेल्या गौण खनिज चोरांना महसूल विभागासोबतच स्थानिक पुढाऱ्यांचे राजकीय पाठबळ मिळत असल्याने त्यांना कोणाचाही धाक उरला नाही .त्यामुळे या संधीचा फायदा घेत त्यांनी तालुक्यातील बिडकीन, चितेगाव फारोळा तसेच पैठण ते पाचोड रस्त्यावरील नानेगाव आणि





गौण खनिज चोरांनी महसूल विभागाच्या नाकावर टिच्चून अक्षरश : धुमाकूळ घातला

ईतर भागातून कधी रात्री तर कधी दिवसाढवळ्या जेसीबी, पोकलेन यंत्राच्या सहाय्याने बेकायदेशीर उत्खनन करून दररोज लाखो रुपयांच्या गौण खनिजाची विक्री करत आहेत . या संबंधीचे तसे व्हिडिओ सोशल मीडियावरून तुफान व्हायरल होत आहे . परन्तु या सर्व प्रकाराकडे सबंधित सज्जाचे जबाबदार तलाठी, मंडल अधिकारी तर सोडाच परंतु पैठण तहसीलच्या तालुकादंडाधिकारीमॅडम, यावर कारवाई करण्याचे आदेश देण्याचे सोडून जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहे .त्यामुळे शासनाला मिळणाऱ्या लाखो रुपयांच्या महसुलाला चुना लावला जात आहे . त्यामुळे आता या गंभीर प्रकाराकडे उप विभागीय मॅडम यांनी स्वत : लक्ष घालून तालुक्यातील ठिकठिकाणवरून होत असलेल्या गौण खनिज चोरीला आळा घालुन सबंधित गौण खनिज चोरांवर कारवाई करावी अशी मागणी तालुक्यातील त्रस्त शेतकरी आणि नागरिकांकडून केली जात आहे .

## श्री.अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ या संस्थेला राज्यस्तरीय शताब्दी दीपस्तंभ पुरस्कार जाहीर



**आष्टी / प्रतिनिधी :**

आष्टी तालुक्यातील कडा येथील श्री . अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ संस्थेला सरपंच परिषद मुंबई यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय शताब्दी दीपस्तंभ पुरस्कार जाहीर झाला आहे .




श्री .अमोलक जैन शिक्षण संस्थेने शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन हा सन्मान दिला जाणार आहे .

सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे यांनी या संदर्भात पत्राद्वारे माहिती दिली आहे . १०० वर्षापासून श्री .अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ संस्था शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहे . गुरुवार दिनांक ३० एप्रिल रोजी सकाळी ११ :३० वा .यशदा पुणे येथे हा पुरस्कार महाराष्ट्र विधान परिषद सभापती प्रा . राम शिंदे यांच्या हस्ते दिला ला जाणार आहे . याप्रसंगी श्री .जयकुमार गोरे, ( ग्रामविकास मंत्री ), महाराष्ट्र राज्य आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पोपटराव पवार यांची उपस्थिती राहणार आहे .

तसेच राज्यस्तरीय शताब्दी दीपस्तंभ पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल अमोलक संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्ष, सर्व पदाधिकारी आणि संचालक मंडळाचे व सर्व अमोलक परिवाराचे हार्दिक अभिनंदन होत आहे .

## संत गोरोबा काका पुण्यतिथीनिमित्त कन्नडमध्ये श्रीमद भागवत कथेचा भक्तिमय सोहळा

### गोरोबाकाका मंदिरात सात दिवस संगीतमय कथा, कीर्तनातून संतांच्या जीवनाचा जागर




**कन्नड / प्रतिनिधी :**

शहरातील गोरोबानगर येथील गोरोबाकाका मंदिरात संत गोरोबा काका यांच्या ७०९ व्या पुण्यतिथीनिमित्त सात दिवसीय संगीतमय श्रीमद भागवत कथेचा भक्तिमय सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला .

या कथामालेत ह .भ .प . आकाशजी शिरसाठ महाराज यांनी अत्यंत रसाळ व भावपूर्ण शैलीत श्रीमद भागवत कथेचे वाचन केले . याच अनुषंगाने ह .भ .प . रामेश्वर महाराज मगर नावडीकर यांच्या सुश्राव्य कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते . कीर्तनातून त्यांनी संत गोरोबाकाका यांच्या जीवनावर आधारित विविध उदाहरणे, धार्मिक दृष्टांत देत उपस्थितांसमोर त्यांच्या जीवनाचा प्रेरणादायी प्रवास उभा केला .

कार्यक्रमाला तालुक्याच्या आमदार सौ . संजना ताई जाधव यांची प्रमुख उपस्थिती लाभली . यावेळी मनोगत व्यक्त करताना त्यांनी गोरोबानगर व गोरोबाकाका मंदिराच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले . तसेच मंदिरासमोर भव्य सभामंडप उभारण्यासाठी २० लाख रुपयांचा निधी मंजूर करून देण्याचे आश्वासन दिले .

या प्रसंगी खरीदी–विक्री संघाचे सभापती ज्ञानेश्वर निकम, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती जयेश बोरसे, शिवसेना शहरप्रमुख रामभाऊ पवार, माजी नगरसेवक विक्रम पाटे, अनिल शिरसाट, आदित्य गर्जे पाटील, दीपक दाभाडे, चंद्रभान मोठे मामा, साहेबराव शिरसाट, वाल्मिक शिरसाठ, प्रेम मोठे, सोपान भाऊ शिरसाठ, गोकुळ गाडेकर, गणेशजी गोरे, उत्तम सूर्यवंशी, मुकेश शिरसाट, किसन भालेराव, योगेश सूर्यवंशी, संभाजी शिरसाट, सिताराम शिरसाट, राजू काळे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला, पुरुष, युवक–युवती व परिसरातील नागरिक उपस्थित होते .


## मांजरसुंबा येथील तरुणाला मारहाण व आत्महत्येस प्रवृत्त प्रकरणातील चारही आरोपींचा जामीन मंजूर

● पान १ वरून . . .मांजरसुंबा येथील नशीब हॉटेल शेजारी एका शेडमध्ये नायलॉनच्या दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली . घटनास्थळी पोलिसांना त्याच्या खिशात एक चिठ्ठी सापडली असून त्यात त्याने आपल्या आत्महत्येस कारणीभूत ठरलेल्या त्रासाचा उल्लेख केला असल्याचे नमूद आहे . या सर्व प्रकारामुळे त्रस्त होऊनच आपल्या मुलाने आत्महत्या केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे .या प्रकरणी नेकनरू पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता, 2023 मधील कलम . 108, 115( 2 ), 3( 5 ), 351( 2 ), 352 कलमांन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे . दरम्यान, जामीन अर्जाच्या सुनावणीवेळी आरोपींच्यावतीने ॲड . दिनेश विनायकराव जाधव यांनी प्रभावी युक्तिवाद सादर केला . यावेळी त्यांना ज्येष्ठ विधिज्ञ ॲड . व्ही . एस . जाधव व ॲड . पी . बी . राख यांनी मार्गदर्शन केले . दोन्ही बाजूंचा युक्तिवाद व प्रकरणातील परिस्थितीचा विचार करून न्यायालयाने चारही आरोपींना जामीन मंजूर केला असून, या निर्णयामुळे आरोपींना मोठा दिलासा मिळाला आहे .

## आर. के. पब्लिक स्कूलचा सीबीएसई निकाल व गुणवंतांचा गौरव सोहळा

# शंभर टक्के निकालाची परंपरा कायम; आर. के. पब्लिक स्कूलमध्ये गुणवंतांचा दिमाखदार सन्मान सोहळा!

### ‘आर. के. पॅटर्न’ची पुन्हा छाप; विद्यार्थ्यांच्या यशामागे शिस्त, मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण मेहनत




आदित्य पिंपरकर 94.00 % घेऊन प्रथम



सक्षम राऊत 91.60 घेऊन द्वितीय



**माजलगाव : अरविंद ओव्हाळ**

शिक्षणात सातत्य, शिस्त आणि गुणवत्तेची परंपरा जपणाऱ्या आर . के . पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेजने यंदाही सीबीएसई दहावीच्या निकालात शंभर टक्के यश मिळवत आपली ओळख अधिक भक्कम केली आहे . या यशस्वी वाटचालीचा आनंद साजरा करण्यासाठी दि . १८ एप्रिल २०२६ रोजी आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला .


या सोहळ्यास परभणी येथील उपविभागीय पोलीस अधिकारी अनिरुद्ध सोपानराव काकडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली . संस्थापक सचिव आर . के . चाळक, अध्यक्षा सौ . योगिता चाळक, प्राचार्य गणेश चाळक, शिक्षकवृंद आणि पालक यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाला विशेष उंची प्राप्त झाली .गौरव सोहळ्यात विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला . विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांसोबत त्यांच्या पालकांचाही गौरव करण्यात आल्याने कार्यक्रम अधिक भावनिक आणि प्रेरणादायी ठरला .

निकालात गुणानुक्रमे विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला— आदित्य पिंपरकर – ९४ .००% ( प्रथम ), सक्षम राऊत – ९१ .६०% ( द्वितीय, हिंदी विषयात शंभरपैकी शंभर गुण ), नंदिनी निकम – ९० .२०%, साई मछले – ८९ .६०%, समीक्षा लोणकर – ८९ .६०%, धनश्री गंधाळे – ८९%, संकेत वाघमारे – ८८ .४०%, राजनंदिनी आरसूळ – ८८%, गौरी वाघमारे – ८७%, दिव्या भुतडा – ८६ .२०%, वरद सारडा – ८६%, दक्ष सोनवणे – ८५ .६०%, रितेश जयस्वाल – ८५ .२०%, यश जाधव – ८४ .८०%, समर्थ गाडे – ८४ .८०%, बालाजी खेडकर – ८४ .६०%, राज उपरे – ८४ .२०%, आदिती निकम – ८२ .८०%, संग्राम धस – ८१ .८०%, श्रावणी राऊत – ८० .६०%, अनिकेत बाणायत – ८० .६०% , ज्ञानेश्वरी डर्फे – ७९%, अक्षरा सोमाणी – ७८ .८०%, प्रांजली चव्हाण – ७८ .८०%, नमन शेख – ७८ .६०%, प्रगती चिलगर – ७८ .४०%, कार्तिक कोकाट – ७८%, श्रेयश फुलशंकर – ७७ .६०%, युवराज जाधव – ७७%, मोक्ष पांडे – ७६ .८०%, प्राची राठोड – ७६ .६०%, श्रुती कादगे – ७६ .६०%, ईश्वरी चाटे – ७६% . यांसह अनेक विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवत शाळेची गुणवत्ता अधोरेखित केली . काही विद्यार्थ्यांनी हिंदीसारख्या विषयांत १०० पैकी १०० गुण मिळवत विशेष प्रावीण्य मिळवले .या यशामागे शिक्षकवृंदाची सातत्यपूर्ण मेहनत, विद्यार्थ्यांवर ठेवलेले वैयक्तिक लक्ष आणि दर्जेदार अध्यापन पद्धती हे प्रमुख घटक असल्याचे अधोरेखित झाले . नियमित सराव, शंका निरसन आणि वेळोवेळी मिळणारे मार्गदर्शन यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला आणि त्यांनी उत्कृष्ट कामगिरी साध्य केली .यावेळी मार्गदर्शन करताना आर . के . चाळक यांनी स्पष्ट केले की, सीबीएसई शिक्षण केवळ निकालापुरते मर्यादित नसून NEET, JEE, MPSC आणि UPSC सारख्या स्पर्धा परीक्षांसाठी मजबूत पाया घालणारे आहे . सातत्य, शिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या जोरावर विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावरही यश मिळवू शकतात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला . शाळेतील सुसज्ज प्रयोगशाळा, समृद्ध वाचनालय, सुरक्षित CCTV व्यवस्था, स्वच्छ आणि निसर्गरम्य परिसर तसेच शिस्तबद्ध वातावरण या सर्व घटकांचा विद्यार्थ्यांच्या यशात मोठा वाटा असल्याचे या निकालातून स्पष्ट झाले . पालकांनी घेतलेल्या योग्य निर्णयामुळे विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळाल्याचेही अधोरेखित झाले .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता दहावीतील विद्यार्थी वीर आरुष यांनी केले, तर आभार प्रदर्शन किशोर कांबळे यांनी केले . शिक्षण, संस्कार आणि मेहनतीचा सुंदर संगम असलेला हा गौरव सोहळा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणेचा नवा दीप ठरला .


### मुख्य मुद्दे

- सीबीएसई दहावीमध्ये १००% निकालाची परंपरा कायम
- गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा
- आदित्य पिंपरकर प्रथम ( ९४% ), सक्षम राऊत द्वितीय ( ९१ .६०% )
- शिक्षकांचे वैयक्तिक मार्गदर्शन आणि नियमित सराव यशाचे गमक
- NEET, JEE, UPSC सारख्या स्पर्धा परीक्षांसाठी भक्कम पाया
- शाळेतील आधुनिक सुविधा आणि शिस्तबद्ध वातावरणाची महत्त्वाची भूमिका

- गेवराईतील विद्यार्थ्यांसाठी सीबीएसई अभ्यासक्रमाचे सक्षम व्यासपीठ
- १९९७ पासून गुणवत्तापूर्ण शिक्षणाची अखंड परंपरा
- “प्रथम शरीरसंपत्ती, त्यावर बौद्धिक संपत्ती आणि त्यातून सामाजिक मूल्यांची उंची” — अनिरुद्ध काकडे



सुसज्ज इमारत



सुसज्ज ग्रंथालय

